संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज...

माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com

● वर्ष : ७ वे ● ● अंक : ५३ वा ● ● रविवार दि. २७ ऑगस्ट २०२३ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025

शिंदे-फडणवीस-पवार म्हणजे 'एक फुल दोन हाफ' ; उद्धव ठाकरे

माणदेश एक्सप्रेस न्युज

हिंगोली : राष्ट्रवादीतील बंडानंतर अजित पवारांच्या रुपाने राज्याला दोन उपमुख्यमंत्री लाभले. राज्यात हा चेष्टेचा विषय ठरत असतांनाच माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी हिंगोलीच्या सभेतून याच मुद्यावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंद आणि दोन उपमुख्यमंत्री फडणवीस-पवार यांची खिल्ली उडवली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाजपच्या कार्यकर्त्यांना येणाऱ्या रक्षाबंधनाला मुस्लिम महिलांकडून राख्या बांधून घेण्याचे आवाहन केल्याचा संदर्भ देत ठाकरेंनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांची खिल्ली उडवली. मोदींनी मुस्लिम महिलांकडून राख्या बांधून घेण्याचे आवानह केले, तेच मी केले असते तर हे एक फूल दोन हाफ माझ्या अंगावर धावून आले असते, असा टोला ठाकरेंनी लगावला.

हिंगोलीच्या जाहीर सभेत उद्धव ठाकरे यांनी पाऊण तास घणाघाती भाषण केले. आमदार संतोष बांगर यांचा थोडक्यात समाचार घेतल्यानंतर संपुर्ण भाषणात उद्धव

ठाकरे यांनी फडणवीस, शिंदे आणि पंतप्रधान मोदी यांना निशाणा केले होते. शिंदे-फडणवीस-पवार सरकार हे ट्रिपल इंजिन असल्याचा दावा करते.परंतु राष्ट्रवादीचा एक गट अजित पवारांच्या नेतृत्वाखाली सरकारमध्ये सामील झाल्यानंतर उपमुख्यमंत्रीपदाची वाटणी झाली. फडणवीस-पवार हे दोन मुख्यमंत्री राज्याला लाभले. विरोधक यामुद्यावरून कायम टीकाही करतात. उद्धव ठाकरे यांनीही आजच्या सभेत दोन उपमुख्यमंत्रीपदाचा उल्लेख करत खिल्ली उडवली. विशेष म्हणजे ठाकरे यांनी फडणवीस, शिंदे, मोदी यांच्यावर यथेच्छ टीका केली असली, तरी अजित पवारांबद्दल त्यांनी थोडी नरमाईची भूमिका घेतल्याचे दिसून आले.अजित पवार उपमुख्यमंत्री झाल्यानंतर विधीमंडळ अधिवेशना दरम्यान, ठाकरेंनी त्यांची विधानभवनात भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या होत्या.

त्यामुळे सभेत ठाकरेंची पवारांबद्दलची भूमिका काहीशी मवाळ दिसून आली. या उलट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस यांच्यावर मात्र ठाकरेंचा दाणपट्टा जोरात सुरू होता. शासन आपल्या दारी, म्हणजे थापा भारी म्हणत केलेली टीका आणि भाजप कार्यकर्त्यांच्या घरात जाऊनच योजनांची माहिती घेण्याचे शिवसैनिकांना केलेले आवाहन याची देखील चर्चा रंगू लागली आहे.

हिंगोलीतील निर्धार सभेत केलेल्या भाषणातून उद्धव ठाकरे यांनी राज्य आणि देशपातळीवरील मुद्यांना हात घालत ऋइंडियाऋ या भाजपविरोधी आघाडीला बळ देण्याचे आवाहन देखील केले. ठाकरेंच्या निर्धार सभेने मराठवाड्यातील निवडणूक प्रचाराचे रणशिंगच फुंकले गेल्याची चर्चा होऊ लागली आहे.

चालत्या बस मधून दीड लाखाचे दागिने लंपास

एस.टी. बस थेट आटपाडी पोलिसात : प्रवाशांची कसून तपासणी

माणदेश एक्सप्रेस न्युज

आटपाडी/प्रतिनिधी : चालत्या बस मधून अज्ञात चोरट्याने तब्बल अंदाजे दीड लाख रुपयांचे दागिने लंपास केल्याची घटना नांदेड-पलूस एस टी बस मध्ये घडली असून या प्रकरणी आटपाडी पोलिसात बस प्रवाशा सह आणण्यात आली असून या ठिकाणी बस मधील सर्व प्रवासी यांची कसून तपासणी करण्यात आली.

याबाबत अधिक माहिती अशी, पंढरपूर बस स्थानक येथून पलूस आगाराची नांदेड पलूस बस (एम एच १४ बी टी ४३३२) निघाली होती. यावेळी बस मध्ये पंढरपूर येथून नीता महेश बावकर ह्या प्रवाशी आटपाडी कडे जाण्यासाठी निघाले होते. महुद जवळीक पळशी फाट्या नजिक बस आली असता, प्रवाशी नीता बावकर यांना त्यांच्या पर्स मधील अंदाजे दीड लाख रुपयांचे दागिने व सात हजार रुपये रोख चोरी झाल्याचे लक्षात आले. यावेळी बस ड्रायव्हर आणि कंडक्टर यांनी बस थेट आटपाडी पोलीस ठाणे येथे आणण्यात आली. यावेळी सर्व प्रवाशी यांची तपासणी करण्यात आली.परंतु कोणत्याही प्रवाशाकडे सोन्याचे दागिने व रोख रक्कम मिळून आली नाही.

आटपाडी : येथील पोलीस ठाणे येथे बस आणून प्रवाशांची तपासणी करण्यात आली. यावेळी अनेक प्रवाशांना ताटकळत बसावे लागले.

आटपाडी बस स्थानक येथे बस आल्यावर सर्व प्रवाशांची तपासणी करण्यात आली. महिला प्रवाशांची तपासणी ही महिला पोलीस करत होत्या. संपूर्ण बसची देखील दोन-तीन वेळा कसून तपासणी करण्यात आली. परंतु कोठेही काहीही मिळून आले नाही.

प्रवास करत असताना सोन्याचे दागिने व रोख रक्कम जवळ बाळगणे नेहमी टाळवा असे वारंवार प्रत्येक बस स्थानकावर असणाऱ्या ध्वनिक्षेपकावरून सूचना दिल्या जात असतात. परंतु प्रशासनाच्या या सूचनाकडे प्रवाशी नेहमी दुलर्क्ष करत असल्याने असे गुन्हे घडत असतात.

बस मधून काही प्रवाशी हे दिघंची येथे उतरून माण तालुक्यातील वरकुटे या गावाकडे तर काही म्हसवड कडे जाणार होते. परंतु दागिने चोरीला गेल्याचे लक्षात आल्यावर बस थेट महूदहून आटपाडी पोलीस ठाणे येथे आणण्यात आल्याने या ठिकाणी बसची तब्बल दोन तास तपासणी करण्यात आली. त्यामुळे माण तालुक्यात जाणाऱ्या प्रवाशांना याचा मोठा त्रास सहन करावा लागला.

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडून हुतात्म्यांना अभिवादन

माणदेश एक्सप्रेस न्युज

परभणी : मराठवाड्यात मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यात येत आहे. 'शासन आपल्या दारी' या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार हे शहरात आले असता त्यांनी येथील राजगोपालचारी उद्यानातील हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून हुतात्मा

आणि स्वातंत्र्य सैनिकांना अभिवादन केले.

याप्रसंगी आमदार श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, आमदार रत्नाकर गुट्टे, माजी खासदार सुरेश जाधव, माजी मंत्री अर्जुन खोतकर आदीसह इतर मान्यवर उपस्थित होते.

व्यावसायिकांनी व्यापक समाज हितासाठी कार्य करावे : राज्यपाल रमेश बैस

माणदेश एक्सप्रेस न्युज

मुंबई : जैन तेरापंथ समाजातील व्यावसायिकांनी आपल्या समाजातील युवकांच्या उन्नतीसाठी स्थापन केलेले आयएएस स्पर्धा प्रशिक्षण वर्ग तसेच इतर उपक्रमांचा लाभ सर्वच समाजांमधील युवकांना करुन द्यावा असे आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी येथे केले. व्यापक समाज हितासाठी कार्य केल्यास ते 'लघुतेकडून प्रभुतेकडे' नेणारे मोठे पाऊल ठरेल, असे प्रतिपादन राज्यपालांनी यावेळी केले.

जैन तेरापंथ समाजातील व्यावसायिकांच्या 'तेरापंथ प्रोफेशनल फोरम' या संस्थेतर्फे

मुंबई : येथे 'लघुतेकडून प्रभुतेकडे' या विषयावरील दोन दिवसांच्या १६ व्या राष्ट्रीय अधिवेशनामध्ये बोलताना राज्यपाल बैस

'लघुतेकडून प्रभुतेकडे' या विषयावरील दोन दिवसांच्या १६ व्या राष्ट्रीय अधिवेशनाचे उद्घाटन राज्यपाल बैस यांच्या मुख्य उपस्थितीत नंदनवन परिसर, ठाणे येथे झाले, त्यावेळी ते बोलत होते. उदघाटनाला जैन तेरापंथ समाजाचे अध्यात्मिक प्रमुख आचार्य महाश्रमण, साध्वी प्रमुखा विश्रुत विभा, मुनी महावीर कुमार, तेरापंथ प्रोफेशनल फोरमचे राष्ट्रीय अध्यक्ष पंकज ओस्तवाल, विश्वस्त चंद्रेश बाफना, रायपूरचे माजी महापौर गजराज पगारिया, मदन तातेड तसेच फोरमचे सदस्य व भाविक उपस्थित होते. **पान नं. २ वर**

अजित पवारांच्या सभेत लोकांनी फिरवली पाठ?

माणदेश एक्सप्रेस न्युज

बीड : उपमुख्यमंत्री अजित पवार यांची रविवारी बीडमध्ये जंगी सभा पार पडली. पण या सभांमधून राज्य सरकार बीडसाठी महत्त्वाच्या घोषणा करेल, या आशेने नागरिकांनी या सभेला सुरूवातीला गर्दी केली, पण काही वेळातच लोकांनी या सभेकडे पाठ फिरवल्याचे दिसून आहे.

यातून बीडकरांनी राज्यसरकारला आपली नाराजी स्पष्टपणे दाखवल्याचे दिसत आहे.

त्याचं झालं असं की, अजित पवारांच्या स्वागताला मोठी गर्दीही जमली,ते बीडमध्ये दाखल झाले, तेव्हा कार्यकर्त्यांनी जल्लोष करत त्यांचं स्वागत केलं. पण मंत्री धनंजय मुंडे आणि अजित पवार यांच्या ताफ्याला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांकडून काळे झेंडे दाखवत निषेधही व्यक्त केला. सभेत जेव्हा अजित पवारांनी भाषण करायला सुरुवात केली, तेव्हा अनेक लोकांनी त्यांच्या भाषणाकडे पाठ फिरवत खुर्च्या रिकाम्या केल्या. बीडचा दुष्काळ कायमचा संपवणारी सभा म्हणून या सभेचा चांगलाच गाजावाजा झाला. मात्र मंत्र्यांची भाषणे सुरू होऊन बराच वेळ झाला तरी बीडकरांसाठी कोणतीही महत्वाची घोषणा नाही. दुष्काळ संपवण्याबाबत कोणतीही घोषणा झाली नाही. पण, दादांच्या भाषणावेळी अनेक खुर्चा रिकाम्याच झाल्याचे पाहायला मिळाले.

तरसाच्या हल्ल्यात चार शेळ्या ठार

सांगली : तरसाच्या हल्ल्यात चार शेळ्या ठार झाल्याची घटना चोपडेवाडी (ता. पलूस) या गावी रविवारी सकाळी उघडकीस आली. वन विभागाच्या कर्मचार्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी करून पंचनामाही केला. गावातील मोहन माने यांचे गावालगत असलेल्या शेतात घर व गोठा आहे. तसेच गोठ्यालगतच शेळ्यांसाठी बंदिस्त शेड उभारले आहे.

शनिवारी रात्री अज्ञात प्राण्याने सहा फूट उंचीच्या भिंतीवरून येऊन शेळ्यांच्या कळपावर हल्ला केला. यामध्ये चार शेळ्यांचा जागीच मृत्यू झाला असून एक शेळी गंभीर जखमी झाली आहे. काल सकाळी चारापाणी करण्यासाठी गेल्यानंतर ही बाब समोर आली. वनपाल ए.एस.जाधव यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता हल्ला तरसाने केला असावा, अशी शक्यता व्यक्त केली.

आटपाडीच्या बीडीएस बँकेला उत्कृष्ट नागरी पुरस्कार

माणदेश एक्सप्रेस न्युज

आटपाडी/प्रतिनिधी : आटपाडी येथील दि. बाबासाहेब देशमुख सहकारी बँकेला दि. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशन लि.मुंबईतर्फे दिल्या जाणाऱ्या ' पद्मभूषण वसंतदादा पाटील उत्कृष्ट नागरी' पुरस्कार प्राप्त झाला आहे.

ग्रामीण आणि दुष्काळी भागात दि.बाबासाहेब देशमुख सहकारी बँक कार्यरत आहे. दुष्काळी ग्रामीण भागात खडतर परिस्थितीत कार्यरत

अमरसिंह देशमुख

असतानाही बँकेची कामगिरी आणि वाटचाल राज्य पातळीवर शासन, प्रशासन आणि विविध संस्थांना दखल घेण्यासारखी केली आहे.बँकेला रु.२५० कोटी ते ५०० कोटीपर्यंत ठेवी असणाऱ्या पुणे गटात पुरस्कार प्राप्त झाला आहे. सदरचा पुरस्कार वितरण सोहळा शनिवार, २३ सप्टेंबर २०२३ रोजी नाशिक येथे मान्यवरांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

प्रत्येक भारतीय सर्वसंपन्न बनला पाहीजे : सादिक खाटीक

माणदेश एक्सप्रेस न्युज

आटपाडी/प्रतिनिधी : प्रत्येक भारतीय या देशाचा मालक असून तो भविष्यात सर्वसंपन्न, परिपूर्ण भारतीय म्हणूनच जगात ओळखला जाण्याइतपत देशात समृद्धता आली पाहीजे. असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशचे महासचिव सादिक खाटीक यांनी व्यक्त केले.

भारत विविध क्षेत्रात जगात नावाजला जात आहे. तथापि कोट्यावधी लोक दोन वेळच्या अन्नासाठी, स्वतःच्या घरासाठी, शिक्षण, औषधोपचार, पिण्याचे पाणी, दळणवळणाची साधने, लाईट, स्वच्छता गृहे वगैरे अनेक मुलभूत गरजांसाठी सतत चिंताग्रस्त असल्याचे सर्वत्र आढळते. लाखों लोक भीक मागत उन, वारा, पावसात उघड्यावर राहतात, झोपतात. विकासलक्ष्मी पासून कोसो दुर असणाऱ्या वंचित, उपेक्षित, मागास, गरीब, महिला, अल्पसंख्याक वगैरेंना भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी खर्चावी लागते.देशातल्या लाखो ठिकाणच्या या दारूण परिस्थितीवर भाष्य करताना विविध दैनिकांशी संवाद साधत सादिक खाटीक यांनी हे मत व्यक्त केले.

सादिक खाटीक पुढे म्हणाले, कृषीप्रधान असलेल्या भारताची सत्तर टक्के जनता शेती, शेतीपुरक व्यवसायावर अवलंबून आहे.शासनकर्त्यांच्या दिशाहीन धोरणाने वाऱ्यावर सोडल्या गेलेल्या शेतीतील नुकसानीमुळे लाखो शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यास भाग पाडले आहे.शेती या भारताच्या मुख्य कण्याचे गणित चुकवले गेले आहे. भारताचे खरे मालक, राजा असणारा शेतकरी, कष्टकरी भारतीय नागरीक आज सर्वच बाजूंनी पोतराजाच्या दुरावस्थेला नेवून ठेवण्याचे काम सुरू आहे.हे दुष्टचक्र कोठेतरी थांबले पाहीजे.मेरे देश की धरती सोना उगले, उगले हिरे मोती हे बोल सार्थ ठरविणारी शेती सर्वसंपन्न केली पाहीजे.शेतकरी कष्टकऱ्यासह प्रत्येक भारतीय मालका सारखा, राजा सारखाच राहीला पाहीजे, अशा पद्धतीने विकासाची दिशा गतिमान केली पाहीजे.

प्रतिवर्षी एका कुटूंबाला आवश्यक तेवढे ६ हजार घनमीटर मोफत पाणी शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत देण्याची व्यवस्था तातडीने उभी करणे, दिले जाणारे पाणी शेतातल्या पिकांना देण्यासाठी आवश्यक वीज मोफत

सादिक खाटिक

पुरविणे, शेती संवर्धनासाठी पीकविणाऱ्या शेतकऱ्याला प्रति एकरी, प्रति वर्षी १०००० रुपये अनुदान देणे, उत्पादीत मालाला साठवून ठेवण्यासाठी प्रत्येक खेड्यात पाच हजार टन क्षमतेचे अन्न धान्ये, कडधान्ये, भाजीपाला, फळफळावळ साठवून ठेवणारी प्रचंड आकाराची शीतगृहांची उभारणी करणे आणि शेतकर्याच्या मालाला कसलेही भाडे आकारले जावू नये अशी या शीतगृहाची व्यवस्था साकारणे महत्वाचे ठरणार आहे. लाख रुपये उत्पन्न घेणाऱ्या प्रत्येकावर १५ टक्के शेतकरी संवर्धन टॅक्स लावला पाहीजे. गोळा होणाऱ्या या टॅक्स मधून भारतीय शेती, शेतकरी, त्याचा परिवार समृद्ध करणारे विविध उपाय, योजना, प्रकल्प साकारले पाहीजेत.

देशातल्या सर्वच धर्मियांचा धार्मीक स्थळांमध्ये जमणारा पैसा भारतीय बजेटच्या १८ पट असल्याचे सांगीतले जाते . देवावर श्रद्धा ठेवून दान देणाऱ्या भोळ्या भाबड्या लोकांच्या कष्टाचा हा पैसा ना सरकार ताब्यात घेवू शकते, ना सामान्य माणसे त्या पैशाला उपयोगात आणू शकतात.हा प्रचंड जमणारा पैसा देशाच्या विकासासाठी वापरला तर प्रत्येक बाबीचा विकास १८ पटीने साधता येईल.जगामध्ये भारत महासत्ता म्हणून विकसीत होण्यास प्रचंड मदत होवू शकेल.या पैशातून देशातल्या प्रत्येक नागरीकांना सर्वप्रकारच्या आरोग्य सुविधा, प्रारंभापासून शेवटपर्यंतचे सर्व विभागांचे शिक्षण शासकीय व्यवस्थेतूनच मोफत देता येवू शकेल.शासकीय व्यवस्थां मधूनच आरोग्य सुविधा व सर्व प्रकारचे शिक्षण मोफत देणारे कायदे कानून अस्तित्वात आले पाहीजेत.शेकडो वर्षापासून सर्वच क्षेत्रात शिक्षण व इतर प्रगतीचे १०० टक्के आरक्षण भोगलेल्या सर्वसंपन्न उच्च जाती, वर्गाला त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात सर्व ठिकाणी आरक्षीत केले पाहीजे.तरच हजारो वर्षापासून सर्वच बाजूंनी उपेक्षित, वंचित, मागास, राहीलेले, शुद्र,अतिशुद्र विकासाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी, आरक्षीत उच्चभ्रु पासून मोकळ्या होणाऱ्या लाखो जागा कारणीभूत ठरणार आहेत. गुणवत्ता ही कोणाची मक्तेदारी नसते, हे वेळो वेळी सिद्ध झाले आहे. आरक्षणातही समान न्याय देणाऱ्या या धोरणानेच देशाची वाटचाल झाली पाहीजे.

कोणत्याही उदयोग, व्यवसाय, बॅका कारखाने, संस्था वगैरे व्यवस्थांमधून मिळणाऱ्या नफ्यातला काही भाग त्या व्यवस्थेतल्या शेअर्स धारकाला, लाभांश म्हणून प्रतिवर्षी दिला जातो.त्याच न्यायाने भारतातल्या लाखो, करोडो , खाजगी, सरकारी, उद्योग, व्यवसाय, कंपन्या, कारखाने, बँकां वगैरे मधून मिळणाऱ्या नफ्यातला काही भाग देशाचे, पर्यायाने या सर्व व्यवस्थांचे मालक असलेल्या प्रत्येक भारतीयाला दिला पाहीजे.याच भूमिकेतून सेवानिवृत्तीच्या वयातल्या प्रत्येक भारतीयाला उर्वरीत आयुष्यात पेन्शन म्हणून कमित कमी पंधरा हजार रुपये दिले पाहीजे.त्यांच्या राहण्याची, खाण्याची, औषधोपचाराची सोय ही शासन व्यवस्थेतून साकारली पाहीजे.प्रत्येक खेड्यात, गावात, शहरातील प्रत्येक वॉर्डात या सेवानिवृत्ती धारकांसाठी सभोवताली प्रशस्त गार्डनयुक्त पाचशे आसन क्षमतेचे सर्व सोयी, सुविधा नियुक्त भारतीय राजांचे भवन साकारले पाहीजे.या वयोवृध्दांसाठी एस.टी.सिटी बस, लोकल, रेल्वे यामधला प्रवास मोफत केला पाहीजे.असे ही सादिक खाटीक यांनी शेवटी स्पष्ट केले.

संपादकिय

कोश्यारींच्या विधानाने उंचवल्या भुवया

राज्याचे तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी हे राज्यपाल काय करू शकतात अन राज्याला देखील राज्यपाल असू शकतो हे देखील राज्यातील जनतेला माहित झाले. भगतसिंह कोश्यारी यांनी राज्याचे राज्यपाल म्हणून काम करण्यापेक्षा भारतीय जनता पार्टीचे काम अधिक केले असेच त्यांच्या एकंदरीत निर्णयावरून राज्यातील जनतेला अवगत झाले. त्यांनी केलेली अनेक विधाने ही राज्यातील महापुरुषांच्या बाबतीत आक्षेपार्ह तर होतीच परंतु त्यांच्या विधानांची सारवासारव करणारी देखील पिलावळ देखील एकप्रकारे त्यांच्या विधानांना एकप्रकारे छुपा पाठिबा देखील देत होती.

खरे तर राज्यपाल पदावरून पायउतार झाल्यावर ते मिडियामधून देखील बाजूला पडले होते. तर भाजपने देखील त्यांना साईटलाईन केले होते. परंतु त्यांनी आता राज्याचे उपमुख्यमंत्री यांच्या बद्दल विधान करून पुन्हा चर्चेत आले असून या विधानाने अनेकांच्या भुवया देखील उंचावल्या आहेत. अजित पवार हे एक असे राजकीय व्यक्तिमत्व आहे ते कायम उपमुख्यमंत्री बनण्यासाठी तयार असतात. त्यामुळे मला कधी कधी त्यांची दया येते. मात्र ते तेवढेच हुशारही आहेत. संघटनेवर त्यांचे प्रभुत्व आहे. त्यांची दया येते असं त्यांनी म्हटले असले तरी त्याचवेळी त्यांनी त्यांची संघटनेवर असलेली हुकमतीचेही त्यांनी कौतुक केले आहे. भगतसिंह कोश्यारी यांनी अजित पवार यांच्यावर टिप्पणी करताना त्यांनी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांचेही मोठेपण त्यांनी अधोरेखित केले आहे. देशातील प्रत्येक क्षेत्रातील व्यक्ती शरद पवार यांचा आधार करते, एवढं त्यांचे मोठेपणही आहे. त्यामुळे आम्ही राजकीय गोष्टींबाबत एकमेकांवर बोलत असलो तरी शरद पवार यांच्याविषयी मला नेहमीच आधार राहिला असल्याचेही सांगत, भगतसिंह कोश्यारी यांनी एकाच वेळी पवार कुटुंबीयांवर आपलं मत व्यक्त करत देशातील राजकारणात शरद पवार यांचे स्थान काय आहे हेही त्यांनी बोलताना आधोरेखित केले आहे. त्यांना दोन विद्यापीठांची डिलीट पदवी माझ्या हस्ते प्रदान करण्याचा मला मानही मिळाला असल्याची आठवणही त्यांनी सांगितली.

अजित पवार हे असं राजकीय व्यक्तिमत्व आहे ज्यांनी तुम्ही कितीही वेळा उपमुख्यमंत्री बनवला तरी त्यासाठी अजित पवार तयार असतात. त्यामुळे मला त्यांची दया येते अशी खोचक टीकाही केली. त्यानंतर त्यांनी त्यांचे संघटन कौशल्य, त्यांचे नेतृत्व आणि पक्षातील स्थान यावर कोश्यारी यांनी आपल्या शैलीत मत व्यक्त केले असल्याने या विधानाने ते पुन्हा चर्चेत आले असले तरी यामुळे अनेकांच्या भुवया देखील उंचावल्या आहेत.

आकाशवाणीचे सतारवादक उस्ताद रफीक नदाफ यांचे निधन

माणदेश एक्सप्रेस न्युज

सांगली : सांगली आकाशवाणी केंद्रातून नुकतेच निवृत्त झालेले प्रसिद्ध सतारवादक उस्ताद रफिक नदाफ यांचे रविवारी २७ ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. ते आकाशवाणी सांगली केंद्रावर सतारवादक कलाकार म्हणून कार्यरत होते.ते मुळचे धारवाडचे होते. आकाशवाणी सांगली केंद्रात संगीत विभागात सतारवादक पदावर रुजु झाले. आकाशवाणी केंद्रातुन त्यांनी आपली सतारवादनाची कला सर्वदूर पोहचवली. राष्ट्रीय शास्त्रीय संगीत सभेच्या माध्यमातून अनेकवेळा सहभागी होत रविवासरीय संगीत सभा आणि शनिवारच्या शास्त्रीय संगीत सभा कार्यक्रमामध्ये सतारवादन सादर केले. रसिकजनांची वाहवा मिळवली. याबरोबरच अनेक दिग्गज सुगम संगीत कलाकारांना त्यांनी सुरेख साथ करत

उस्ताद रफीक नदाफ

कार्यक्रमाचा दर्जा वाढवला. वालचंद महाविद्यालय आणि सांगली मिरज शहरात त्यांनी आपल्या शिष्यासमवेत राष्ट्रीय कार्यक्रमामध्ये म्हणजे स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिनी सतारवादनाचे सांघिक कार्यक्रम केले. तसेच दिल्ली येथील राजपथावर जाहीर कार्यक्रम सादर केले.

गदर २ ने कमाईत 'केजीएफ २' चा मोडला रेकॉर्ड

माणदेश एक्सप्रेस न्युज

मुंबई : सनी देओलचा 'गदर २' सध्या धुमाकूळ घालत आहे. ११ ऑगस्ट रोजी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर जोरदार कमाई केली आहे. प्रदर्शनाच्या पहिल्या दिवसापासूनच चित्रपटगृहांमध्ये गदर २ ची क्रेझ पाहायला मिळत आहे. चित्रपटाने पहिल्याच दिवशी ४० कोटींची कमाई केली. आता गदर २ ने कमाईच्याबाबतीत कन्नड अभिनेता यशचा सुपरहिट चित्रपट घत्रक्ष २ लाही मागे टाकले आहे.

गुर २ ने १५ दिवसांत बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई केली आहे. गदर २ ने भारतीय बॉक्स ऑफिसवर आतापर्यंत ४२६.२० कोटींचा गल्ला जमवला आहे. चित्रपटाने प्रदर्शनाच्या १६ व्या दिवशी म्हणजेच २५ ऑगस्ट रोजी १२.५० कोटींचा व्यवसाय केला आहे, आत्तापर्यंत या चित्रपटाचे एकूण कलेक्शन ४३८.७० वर पोहोचले आहे. यासह या चित्रपटाने जागतिक स्तरावर ५१९ कोटींचा गल्ला जमवला आहे. केजीएफ २ ने भारतात ४३४ कोटींचा गल्ला जमवला होता. भारतात सर्वाधिक कमाई करणारे दोन चित्रपट आहेत. यात शाहरुख खानचा पठाणचा समावेश आहे. 'पठाण'ने भारतात ५४३ कोटींची कमाई केली होती. तर एसएस राजामौलीचा बाहुबली २ हिंदी डब व्हर्जनने ५१० कोटींचा गल्ला जमवला होता. गदर २ ची बॉक्स ऑफिसवर कमाई पाहता हा चित्रपट लवकरच भारतात ५०० कोटींचा आकडा पार करेल असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लाभार्थ्यांना लाभाचे वितरण

माणदेश एक्सप्रेस न्युज

परभणी : 'शासन आपल्या दारी' या कार्यक्रमाच्या माध्यमातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते येथे अनेक लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभाचे वितरण करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार हे प्रामुख्याने व्यासपीठावर उपस्थित होते.

'शासन आपल्या दारी' या कार्यक्रमाच्या माध्यमातून समाज कल्याण कार्यालय, परभणी यांच्यामार्फत परभणी येथील अमिता रौफ बक्श यांना तृतीयपंथी म्हणून ओळखपत्र देण्यात आले. तसेच के. के. एम. महाविद्यालय मानवत येथील इयत्ता बारावीची विद्यार्थिनी प्रियंका भगीरथ अदमाने हिला राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार अंतर्गत १० हजार रुपयाचा धनादेश, पी. डी. जैन होमिओपॅथीक महाविद्यालयाच्या तनुजा संजय तायडे या विद्यार्थिनीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना-वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना भोजन व निवासाची सोय व्हावी म्हणून रोख रक्कम आधार संलग्न बँक खात्याद्वारे देण्यात आली आहे. जिंतूर तालुक्यातील करवली येथील भारत स्वयंसहायता बचतगटाच्या शिल्पा रवी

परभणी : येथे लाभार्थ्यांना लाभाचे वितरण करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपस्थित मान्यवर

मानवते यांना अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील स्वयंसहायता बचतगटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा योजनेअंतर्गत वाटप करण्यात आले. वडगाव सुक्रे येथील वैशाली नाना हातागळे यांना ऊसतोड कामगार म्हणून ओळखपत्र मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

मानवत तालुक्यातील कुंभारी येथील घनश्याम मधुकर रणखांबे यांना कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेअंतर्गत चार एकर जिरायत शेतजमिनीचे वाटप समाज कल्याण विभागामार्फत करण्यात आले. गंगाखेड येथील गणपती यादव सवराते यांना हिंदुहृयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग जोडणारा जालना-नांदेड द्रुतगती महामार्गाच्या भूसंपादनाचा लाभ म्हणून ७८ लाख ५१ हजार ७६५ रुपयांचा धनादेश उपविभागीय अधिकारी (भूसंपादन) यांच्यामार्फत देण्यात आला. परभणी शहरातील मंगलमूर्ती नगरातील रहिवाशी श्रीपादराव प्रल्हादराव झांबरे यांना प्रधानमंत्री आवास योजना सर्वांसाठी घरे या योजनेअंतर्गत महानगरपालिकेमार्फत २ लाख ५० हजार रुपये लाभाची रक्कम देऊन घरकुल बांधकाम कार्यारंभ आदेश प्रमाणपत्र देण्यात आले. विकास प्रभाकर धापसे यांना रमाई घरकुल आवास योजनेअंतर्गत नगर परिषद सेलू यांच्याकडून घराची चावी मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली.

व्यावसायिकांनी व्यापक समाज हितासाठी कार्य करावे : राज्यपाल रमेश बैस

पान नं. १ वरुन : पशुपक्ष्यांना संकटात सापडलेल्या आपल्या इतर बांधवांना फारशी मदत करता येत नाही. मात्र, संकटात सापडलेल्या आपल्या बांधवांना तसेच मूक प्राण्यांना मदत करण्याची क्षमता ईश्वराने केवळ मनुष्याला दिली आहे असे सांगून यशस्वी व्यावसायिकांनी आपली शक्ती व क्षमतेचा वापर करून, ग्रामीण, आदिवासी भागातील गरीब, दिव्यांग, अनाथ लोकांना तसेच कैदी बांधवांना मदत करावी असे राज्यपालांनी सांगितले. भगवान महावीरांच्या अध्यात्मिक शिकवणीला अनुसरुन जैन आचार्य तुलसी यांनी अणुव्रत आंदोलन सुरु केले व त्या माध्यमातून महिलांचे शोषण, हुंडा प्रथा, अस्पृश्यता इत्यादी सामाजिक कुप्रथांविरुद्ध आवाज उठवला याचे स्मरण राज्यपालांनी दिले. व्यसनमुक्तीसाठी त्यांनी मोठे अभियान सुरु करुन हजारो लोकांना व्यसनांपासून सोडवले. त्यांच्या शिकवणीप्रमाणे प्रत्येक व्यक्तीने छोटे-छोटे संकल्प करुन आत्मविकास, समाज विकास व राष्ट्र विकासाच्या कार्यात योगदान द्यावे, असे राज्यपालांनी सांगितले. अहिंसा यात्रे'च्या माध्यमातून व्यसनमुक्ती, नैतिकता व सद्भावना निर्माण करण्याच्या आचार्य महाश्रमण यांच्या कार्याचा राज्यपालांनीगौरव केला.

यावेळी सर्व उपस्थित भाविक व व्यावसायिकांना संबोधित करताना आचार्य महाश्रमण यांनी दुर्गुणांचा त्याग व सद्गुणांचा विकास केल्यास मनुष्य देवत्वाकडे वाटचाल करतो, असे सांगितले. आचार्य तुलसी यांनी प्रतिपादन केलेल्या अणुव्रतांचा अंगीकार करुन तसेच आचार्य महाप्रज्ञ यांनी सांगितलेल्या प्रेक्षाध्यानाच्या माध्यमातून सद्भावना व नैतिकता वृद्धिंगत होते, असे त्यांनी सांगितले. सुरुवातीला तेरापंथ प्रोफेशनल फोरमचे राष्ट्रीय अध्यक्ष पंकज ओस्तवाल यांनी फोरमच्या राष्ट्रव्यापी सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. आचार्य महाश्रमण प्रवास समितीचे प्रमुख मदन तातेड यांनी स्वागतपर भाषण केले.

मुंबईतील पर्यटन स्थळांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणार : राहुल नार्वेकर

माणदेश एक्सप्रेस न्युज

मुंबई : शहरातील हरित उद्याने तयार करण्यात नागरिकांचाही मोठा सहभाग आहे. लवकरच कोळीवाडा मच्छिमार क्षेत्र, चर्चगेट, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, गेट वे ऑफ इंडिया येथे आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने पर्यटनाच्या दृष्टीने विकास करणार असल्याचे विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांनी सांगितले.

कुलाबा, कफ परेड येथे सुरक्षा उद्यानाचे लोकार्पण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या सोहळ्यात अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर बोलत होते. अध्यक्ष ड् नार्वेकर म्हणाले की,

मुंबई : कुलाबा, कफ परेड येथे सुरक्षा उद्यानाचे लोकार्पण प्रसंगी बोलताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर

उद्यानाचे लोकार्पण नागरिक आणि येथील रहिवाशी संघाचे यश आहे. या क्षेत्रात रहिवाशांच्या तुलनेत कामानिमित्त विविध कार्यालय आणि संस्थांमध्ये असलेली लोकसंख्या जास्त आहे. या परिसरात हरित उद्यानाबरोबरच लवकरच नव-नवीन बदल घडणार आहेत. परिसर स्वच्छ व दुरूस्ती देखभालीमध्ये सातत्य राखणे नागरिकांचे कर्तव्य आहे. मुंबई शहरात राहण्यासाठी सुयोग्य आणि शाश्वत विकासाचा बदल घडवून आणणार आहे. शहरात हरित क्षेत्रात वाढ करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. या वर्ष अखेरीस शहराच्या सागर तटीय मार्गाचा काही भाग नागरिकांना प्रवासासाठी सुरू करण्यात येणार असून, कफ परेड ते विरारचा प्रवास सुकर आणि कमी वेळात होणार आहे. ट्रान्स हार्बर आयकॉनिक ब्रिजमुळे मुंबई आणि नवी मुंबई शहरे जोडली जाणार आहेत. तसेच तेथून नवी मुंबई विमानतळासाठी दूसरा सागरी मार्ग तयार करण्यात येणार आहे. समुद्रात सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यावर प्रकिया करण्यासाठी मानके तयार करण्यात आले आहेत. लवकरच १०० टक्के प्रक्रिया केलेले पाणीच समुद्रात सोडले जाईल. तसेच भरती आली की शहरात साचलेले पाणी भुमार्गातून समुद्रात जाण्यासाठी जपानच्या सहायाने यंत्रणा तयार करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

यावेळी मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पुर्व उपनगरे) अश्विनी भिडे, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) पी. वेलरासू , अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) सुधाकर शिंदे, नगरसेवक हर्षिता नार्वेकर, मकरंद नार्वेकर , कफ परेड रहिवाशी संघाचे प्रतिनिधी आणि नागरिक उपस्थित होते.

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

दैनिक
माणदेशी बुलंद आवाज...
माणदेश एक्सप्रेस

पानवण येथील चौघांवर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

माणदेश एक्सप्रेस न्युज
म्हसवड/प्रतिनिधी : जातिवाचक शिवीगाळ करून, मारहाण केल्याप्रकरणी म्हसवड पोलीस ठाण्यात पानवण येथील चार जणांवर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
याबाबत म्हसवड पोलीस ठाण्यातून मिळालेली माहीती अशी, पानवण ता. माण येथील देवदास महादेव तुपे(वय १७वर्षे) याने म्हसवड पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दिली आहे. दि २६ रोजी सकाळी ०९.०० वा. चे सुमारास मौजे पाणवन ता.माण गावचे हद्दीत महालक्ष्मी खताचे दुकानाचे समोर फिर्यादीची आई गुरांसाठी कडवळ घेण्यासाठी दिलेले पैसे देवदास रोहिदास नरळे यास परत मागितले असता त्याचा राग मनात धरुन आरोपी देवदास रोहिदास नरळे, पिंटु उर्फ शाताराम रोहिदास नरळे, संतोष गोपाळ नरळे, जनाप्पा विठ्ठल शिंदे सर्व रा पाणवन यांनी आपआपसात संगणमत करुन फिर्यादीची आई शाहिदा हीस डोक्याचे केस धरुन फरपटत रस्त्यावर आणुन तिचे आंगाशी झोंबाझोंब करुन मलाही चौघांनी हाताने व लाथाबुक्याने मारहाण करुन तिचे मनास लज्जा निर्माण होईल असे कृत्य करुन या मांगाट्यांना लय मस्ती आलीय त्यांना गावातुन हकलुन बाहेर काढु असे म्हणुन धमकी दिली.
याप्रकरणी म्हसवड पोलीस ठाण्यात वरील चार जणावर ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून वर नमूद गुन्हयातील आरोपी एक व दोन यांना ताब्यात घेण्यात आले असून उर्वरित २ आरोपींचा शोध सुरु आहे. अधिक तपास सपोनि राजकुमार भूजबळ करत आहेत.

आज बालेवाडीत 'शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार' प्रदान सोहळा होणार संपन्न

माणदेश एक्सप्रेस न्युज
पुणे : क्रीडा क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या क्रीडा महर्षी, मार्गदर्शक, खेळाडू, यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात येतात. सन २०१९-२०,२०२०-२१ व २०२१-२२ या वर्षाचे पुरस्कार राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते २८ ऑगस्ट रोजी पुण्यातील शिवछत्रपती क्रीडा संकुल, येथे सायंकाळी पाच वाजता प्रदान करण्यात येणार आहेत. हा पुरस्कार प्रदान सोहळा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीतीत संपन्न होणार असल्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले.

मंत्री संजय बनसोडे

मंत्री श्री. बनसोडे म्हणाले की, राज्यात क्रीडा संस्कृतीचा वारसा जपला जाऊन त्याचे संवर्धन व्हावे, तसेच क्रिडापटूंना प्रोत्साहन देण्यासाठी पुरस्कार प्रदान करण्यात येतात. या सोहळयात तीन वर्षांचे एकूण ११९ पुरस्कार प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार (सन २०१९-२०) श्री. श्रीकांत शरदचंद्र वाड (ठाणे) यांना, (सन २०२०-२१) श्री दिलीप बळवंत वेंगसरकर आणि (सन २०२१-२२) श्री.आदिल जहांगिर सुमारीवाला, (मुंबई) यांना प्रदान करण्यात येणार असून विविध क्रीडा प्रकारात प्रावीण्य प्राप्त खेळाडूंना पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याचे मंत्री श्री. बनसोडे यांनी सांगितले.
उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील , विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गो-हे, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्री गिरीश महाजन आदि मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

ऊसाला पाच हजार रुपये दर मिळविण्यासाठी संघर्ष

महेश खराडे : बेदान्या बरोबर दूध आणि अंडी समावेश करण्यासाठी प्रयत्न

माणदेश एक्सप्रेस न्युज
तासगाव : शेतकऱ्यांनी राजकारण बाजूला ठेवून संघटित होण्याची गरज आहे. शेतकऱ्यांना लुटणारी व्यवस्था तयार झाली आहे. लुटणाऱ्या व्यवस्थेला मोडून काढण्यासाठी सज्ज व्हावे.उत्पादन खर्च प्रचंड वाढला आहे. त्यामुळे ऊसाला पाच हजार रुपये दर व बेदाण्या बरोबर दूध आणि अंडी शालेय पोषण आहारात समावेश करण्यासाठी प्रयत्न करणार अशी ग्वाही स्वाभिमानीचे जिल्हाध्यक्ष महेश खराडे यांनी दिली.
तासगाव तालुक्यातील मांजर्डे येथे बेदाण्याचा शालेय पोषण आहारात समावेश करण्यासाठी प्रयत्न केल्याबद्दल आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते. या प्रसंगी माजी जि. प. सभापती कमलताई पाटील, वसंतदादा कारखान्याचे माजी उपाध्यक्ष संभाजी खराडे, उपसरपंच मोहन पाटील, ग्रा.प.सदस्य सुरेश खराडे, विनायक मोहिते, बजरंग मोहिते, उत्तम मोहिते उपस्थित होते.
खराडे म्हणाले, द्राक्ष बेदाणा उत्पादकांची वाइट अवस्था झाली आहे, त्यामुळे आम्ही दोन ते तीन मोर्चे काढले. 'चड्डी मोर्चा' बेदाणा मोफत वाटप केला. त्यामुळेच मुख्यमंत्र्यांनी चर्चेला बोलाविले. त्यावेळी त्यांना द्राक्ष बेदाणा उत्पादक शेतकऱ्याची वस्तुस्थिती सांगितली. त्यामुळेच बेदाणा शालेय पोषण आहारात समावेश करण्याचा निर्णय घेतला. हे स्वाभिमानीच्या लढ्याचे यश आहे. यामुळे राज्यातील एक कोटी विद्यार्थ्यांना बेदाणा मिळणार आहे. हा बेदाणा थेट शेतकऱ्याकडूनच विकत घ्यावा यासाठी प्रयत्न राहणार आहे.

तासगाव : येथील मांजर्डे येथे महेश खराडे यांचा सत्कार करताना कमलताई पाटील व उपस्थित मान्यवर

यापुढे द्राक्ष. बेदाणा खाणे कसे फायदेशीर आहे हे सांगणारी जाहिरात टीव्ही वर प्रसिद्ध करावी यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. द्राक्ष बेदाणा महामंडळाची स्थापना करावी, सक्षम द्राक्ष पीक विमा योजना सुरू करावी यासाठी आमचा आग्रह असणार आहे.
शेतीचा उत्पादन खर्च प्रचंड वाढला आहे. त्यामुळे उसाचा सद्याचा दर परवडत नाही. तो पाच हजार झाला पाहिजे हा आमचा आग्रह आहे. पण तो दर घरात बसून मिळणार नाही. त्यासाठी मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी राजकारण गट तट बाजूला ठेवून आंदोलनात सहभागी झाले पाहिजे. याशिवाय तोडीसाठी द्यावे लागणारे पैसे बंद झाले पाहिजेत. वजनातील काटामारी थांबली पाहिजे, उतारा बाधावरच कळाला पाहिजे, आदी प्रश्न सोडवायचे आहेत. त्यासाठी तुमची साथ हवी आहे. यावेळी कमलताई पाटील, संभाजी खराडे, सुरेश खराडे, मोहन पाटील, प्रसाद खराडे, पंढरीनाथ मोहिते, अनिल खराडे यांची भाषणे झाली.
सूत्रसंचलन महेश साळुंखे यांनी केले. आभार कुमार जाधव यांनी मानले. कार्यक्रमाला लक्ष्मण मंडले, बजरंग मोहिते, किसन मोहिते, पप्पु खराडे, संजय लाड, पांडुरंग खराडे, निलेश खराडे, शंकर जावीर आदीसह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

मृणाल गांजाळे राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराच्या मानकरी

माणदेश एक्सप्रेस न्युज
पुणे : केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार घोषित करण्यात आले. त्यात पुणे जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षिका मृणाल गांजाळे या पुरस्काराच्या मानकरी ठरल्या असून, यंदा राज्यातील एकाच शिक्षकाला हा पुरस्कार मिळाला आहे.

मृणाल गांजाळे

शिक्षण क्षेत्रात प्रयोगशील काम करणाऱ्या शिक्षकांना केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून दरवर्षी राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने गौरवण्यात येते. पुरस्काराचे मानकरी ठरलेल्या शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक दिनी पुरस्कार प्रदान करण्यात येते. यंदा मंत्रालयाकडून देशभरातील ५० शिक्षकांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला. पाच सप्टेंबर रोजी नवी दिल्ली येथील विज्ञान भवनमध्ये पुरस्कार प्रदान कार्यक्रम होणार आहे. मृणाल गांजाळे या पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील पिंपळगाव महाळुंगे जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळेतील शिक्षिका आहेत. गेली काही वर्षे राज्यातील किमान दोन शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार मिळत होता. मात्र यंदा राज्यातील एकमेव शिक्षकाचा राष्ट्रीय स्तरावर गौरव झाला आहे.

श्रीनिवास पाटील म्हणाले, 'शरद पवार ठरवतील तेच..

माणदेश एक्सप्रेस न्युज
पुणे : शरद पवार ठरवतील तेच तोरण, धोरण आणि समाजकारण करणार आहे. वेळ उरलाच तर निवडणुकीपुरते राजकारण करणार, असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार श्रीनिवास पाटील यांनी पक्षाचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार यांच्यासोबत असल्याची ग्वाही रविवारी पुण्यात दिली.

श्रीनिवास पाटील

शिवराज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षानिमित्त सह्याद्री प्रतिष्ठानने तयार केलेल्या 'शिवराज्याभिषेक : भारताच्या इतिहासातील असामान्य घटना' या ग्रंथाचे प्रकाशन शरद पवार यांच्या हस्ते झाले, त्यावेळी पाटील बोलत होते. ग्रंथाचे मुख्य संपादक डॉ. सदानंद मोरे यांना शिवराज्यभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. खासदार श्रीनिवास पाटील, विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित, एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड, प्रतिभा पवार, ज्येष्ठ इतिहास अभ्यासक पांडुरंग बलकवडे आणि सह्याद्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनिल निवृत्ती पवार या वेळी उपस्थित होते.
पाटील म्हणाले, की शरद पवार यांच्यामुळे मी पुण्यात जिल्हाधिकारी म्हणून आलो. शिवरायांचा इतिहास पुण्यात जवळून पाहता आला. भक्ती आणि शक्ती यांचा संगम असलेले भक्तीशक्ती शिल्प उभारणीचे काम आमच्या हातून घडले. त्याचे उद्घाटनही पवार यांच्या हस्ते झाले. आता शरद पवार ठरवतील, तेच आमचे तोरण आहे. त्याचबरोबर तेच आमचे धोरण आणि समाजकारण आहे. यातून वेळ उरलाच तर निवडणुकीपुरते राजकारण करणार आहे.

जपानमधील गुंतवणूकदारांकडून राज्यात मोठ्या गुंतवणूकीची शक्यता : फडणवीस

मुंबई : जपान दौऱ्यावरून आल्यावर देवेंद्र फडणवीस यांचे मुंबई विमानतळ येथे स्वागत करताना मंत्री दीपक केसरकर व उपस्थित मान्यवर

माणदेश एक्सप्रेस न्युज
मुंबई : जपान सरकारच्या विशेष निमंत्रणावरूनजपान दौऱ्यावर गेलेले उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आज मुंबईत आगमन झाले. शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर तसेच अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.
आगमनानंतर पत्रकारांशी बोलताना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, जपानच्या या दौऱ्यात जपान सरकारचे मंत्री, पंतप्रधानाचे सल्लागार, विविध कंपन्या, अधिकारी,प्रांतांचे गव्हर्नर, कंपन्या, एंजन्सी यांच्यासोबत आपण सविस्तर बैठका केल्या असून जपानच्या काही कंपन्या शिष्टमंडळासह भारतात चर्चेला येऊ इच्छितात.
नवीन भारताच्या क्षमतेवर प्रचंड विश्वास त्यांनी दाखविला आहे. त्यातील मोठा वाटा महाराष्ट्रात यावा, असा आपला प्रयत्न राहील.
मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेने एक विशेष चमू आम्ही तयार करणार आहोत. जपानी भाषा बोलता येणारे लोक त्यात असतील. डेटा सेंटर्स ते सेमी कंडक्टर, अशा सर्वच क्षेत्रात ही गुंतवणूक आणण्यात येईल, असा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.
राज्यात आपण वर्सोवा-विरार सीलिंक तयार करतो आहे, त्यासाठी मदत करण्यास जपान सरकारने सकारात्मकता दाखविली आहे. केंद्र सरकारची मंजुरी मिळताच त्यादृष्टीने पुढची पाऊले टाकली जातील. मेट्रो ११, मुंबई पूर व्यवस्थापन प्रकल्पाला सुद्धा मदत करण्याची तयारी जपानने दर्शविली आहे.
एनटीटी आणि सोनी यासारख्या व इतर कंपन्या राज्यात गुंतवणूक करण्यासाठी इच्छुक आहेत. जपानमधील मोठमोठे उद्योग भारतात येऊ इच्छितात. या सर्व उद्योगांना सहकार्य करण्याची राज्य सरकारची भूमिका आहे. तसेच जायका, जेट्रो, जेरा यासारख्या कंपन्यांकडून मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्य मिळवून राज्यातील विविध प्रकल्प मार्गी लावण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे.
चांद्रयान मोहिमेच्या लँडिंगसाठी मराठी बांधव मोठ्या संख्येने जपानमध्ये एकत्रित जमले होते. त्यांच्यासोबत बसून मला हा सोहोळा पाहता आला, याचा मला अतिशय आनंद झाला. जणू भारत तेथे साकारला होता, अशी आठवण सुद्धा देवेंद्र फडणवीस यांनी सांगितली. कोयासन विद्यापीठाने मला मानद डॉक्टरेट दिली, याचा खूप आनंद झाला, हा माझा नाही, तर महाराष्ट्राचा सन्मान आहे, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

मांडवेजवळ बस-टिपर अपघात

अपघातात टिपरचा चालक ठार : २१ प्रवाशी जखमी

माणदेश एक्सप्रेस न्युज

नातेपुते/वार्ताहर : मांडवे येथील पुलाजवळ पुणे-पंढरपूर पालखी मार्गावर टिपर व एसटी बसचा मोठा अपघात झाला. मंगळवेढा डेपोची पुणे-पंढरपूर-मंगळवेढा ही बस नातेपुते वरून पंढरपूर कडे जात असताना समोरून टिपर आल्याने समोरासमोर भीषण अपघात झाला. या अपघातात एसटी बसमधील २१ प्रवासी जखमी झाले असून टिपरचा चालक जागीच ठार झाला आहे. शंकर कुमार मंडल-पुनिया (वय २४बिहार) असे ठार झालेल्या टिपर चालकाचे नाव आहे.

जखमी प्रवाशीयांना नातेपुतेतील रुग्णालयात उपचार घेत आहे.यात दोघांची परिस्थिती गंभीर असल्याने सोलापुरातील रुग्णालयात पाठवण्यात आले आहे.रस्त्याच्या अर्धवट कामामुळे भीषण अपघात होत असल्याने याला जबाबदार कोण असा प्रश्न राजकुमार हिवरकर यांनी विचारत पालखी महामार्गाचे काम म्हात्रे कंपनीने बंद ठेवावे कारण आत्तापर्यंत शेकडो लोकांना त्यांच्या चुकीच्या काम करण्याच्या पद्धतीमुळे जीव गमवावा लागलेला आहे. झालेल्या अपघातात काहींची लहान बाळ वेगळ्या दवाखान्यात आहेत तर आई वेगळ्या दवाखान्यात.

यात १४ वर्षाचा मुलगा अपघातात गंभीर जखमी झाल्याने त्याला सोलापूरला पाठवण्यात आले आहे. त्याच्याबरोबर एका ७० वर्ष ज्येष्ठ नागरिकांना सुद्धा सोलापूरला हलवण्यात आले आहे. या घटनेची गंभीर दखल घेत सोलापूर शिवसेना संपर्कप्रमुख शिवाजीराव सावंत व राज्याचे आरोग्य मंत्री तानाजीराव सावंत यांनी तात्काळ शिवसैनिकांना व आरोग्य अधिकाऱ्यांना योग्य उपचार करण्याचे आदेश दिलेले आहेत. रस्त्याची ही सर्व परिस्थिती फक्त म्हात्रे कंपनीच्या चुकीच्या काम करण्यामुळे नागरिकांना जीव गमावा लागत आहे. हा रस्ता 'मौत का कुवा' बनला असून, अपघात व हानी नित्याचीच असल्याने नागरिकांच्या आणि प्रवाशांच्या सहनशीलतेचा अंत पाहु नये. त्यामुळे जोपर्यंत म्हात्रे कंपनी प्रवाशांच्या जीवाची काळजी घेत नाही तोपर्यंत कंपनीने काम बंद ठेवावे अन्यथा शिवसेना आपल्या स्टाईलनं उत्तर देईल असा इशारा शिवसेनेच्या वतीने तालुकाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांनी केला आहे.

मांडवे : येथील पुलाजवळ झालेल्या अपघातातील अपघातग्रस्त एस.टी. बस

डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक प्रकरणी जनतेची दिशाभूल

अमोल वेटम : वार्ड क्रमांक ८ मनपा खुल्या भूखंडावरील मंजूर ठराव ऐनवेळी रद्द का?

माणदेश एक्सप्रेस न्युज

सांगली : सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्रमांक ८ मधील स.नं. १० (क्षेत्र २४.६१ आर) या मनपा मालकीच्या खुल्या भूखंडावर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नावाने स्मारक उभारून सुसज्ज वाचनालय निर्माण करण्यासाठी महासभा दिनांक १४ जून २०१९ रोजी महासभा ठराव क्रमांक ४३, दिनांक १८ सप्टेंबर २०२० रोजी महासभा ठराव क्रमांक ४६ अन्वये मंजुरी देण्यात आली होती.

या ठिकाणी सुसज्ज वाचनालय, उद्यान विकसित करणेकामी नकाशा, आराखडा व अंदाजपत्रक तयार करणेसाठी वास्तुविशारद एस.पी.तायवडे-पाटील यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली होती .यानंतर या प्रभागातील संबंधित नगरसेवक यांनी याठिकाणी बुद्ध पौर्णिमादिनी उद्घाटन करून कोट्यावधी निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वसन दिले होते. याकामी शासन हिस्सा ९० टक्के तर १० टक्के मनपा स्वहिस्सा भरण्यास तयार असल्याचे व सदर जागेची जबाबदारी मनपा स्वीकारत असल्याचे बंधपत्र शासनास सादर करण्यास मान्यता देखील महासभेने दिलेली आहे. गेले चार वर्ष याठिकाणी कोणताही विकास या ठिकाणी मनपा तसेच नगरसेवकांनी केले नाही.

असे असताना दिनांक २० जून २०२३ रोजी ऐनवेळी महासभा ठराव क्रमांक ५६१ मांडून तांत्रिक अडचणींचे अवास्तविक कारण पुढे करून वरील दोन्ही मंजूर असलेला ठराव ऐनवेळी रद्द करून घेण्यात आला यावर सूचक नगरसेवक राजेंद्र कुंभार, अनुमोदक नगरसेविका सोनाली सागरे म्हणून यांच्या सह्या आहेत.केवळ नागरिकांची, आंबेडकर समूहाची दिशाभूल करण्यात आली.या भूखंडावर कोणाचा डोळा आहे याची चौकशी देखील करण्यात यावी.

वरील प्रकाराची मनपा आयुक्त यांनी तत्काळ चौकशी करून सदर नियोजित ठिकाणी कामकाज तत्काळ सुरु करावे, जागेची मोजणी करावी, आराखडा तयार करावा अन्यथा मनपा कार्यालय समोर विविध आंबेडकरी संघटनेच्या वतीने येत्या सात दिवसात आंदोलन छेडण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते अमोल वेटम, दिनेश साबळे, संतोष सरोदे, प्रमोद कांबळे यांनी दिला.

तलाठी परीक्षेचा पेपर फोडणारा आरोपी आरोग्य विभागाच्या परीक्षेत पास

माणदेश एक्सप्रेस न्युज

नागपूर : तलाठी भरती परीक्षेच्या पहिल्याच दिवशी पेपर फोडणारा आरोपी गणेश गुसिंगे याच्यासंदर्भात नवीन खुलासा समोर आला आहे. वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाकडून घेण्यात आलेल्या भरती परीक्षेत तो उत्तीर्ण झाल्याची माहिती समोर येत आहे. या भरतीच्या परीक्षेमध्ये गणेश गुसिंगेला १३८ गुण प्राप्त झाले. आरोपी उमेदवार उत्तीर्ण झाल्याने भरतीप्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केला जात आहे.

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाने काल निकाल जाहीर केला. त्यामध्ये प्रयोगशाळा सहाय्यक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, ग्रंथपाल, स्वच्छता निरीक्षक, ई.सी.जी. तंत्रज्ञ, आहारतज्ज्ञ,औषधनिर्माता अशा विविध ५१८२ पदांसाठी ही भरती परीक्षा होती. या परीक्षेत याआधी म्हाडा, पिंपरी चिंचवड पोलीस भरती आणि तलाठी भरती परीक्षेत आरोपी असलेल्या गणेश गुसिंगेला २०० पैकी १३८ गुण मिळाले. त्यामुळे या परीक्षेतसुद्धा या उमेदवाराने गैरप्रकार केला का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

ईडी हसन मुश्रीफांचे घर विसरली : उद्धव ठाकरे

माणदेश एक्सप्रेस न्युज

हिंगोली : भ्रष्टाचाराबाबत भाजपला बोलण्याचा अधिकार नाही. मागील वर्षी एक रक्षाबंधनचा फोटो आला होता. एका ताईंनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना राखी बांधली आणि 'ईडी' थांबली. असा टोला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी खासदार भावना गवळी यांचे नाव न घेता लगावला. मंत्री हसन मुश्रीफ यांच्या घरावर 'ईडी'ने अनेक धाडी टाकल्या. मात्र, ते दादांचे बोट धरून भाजपसोबत गेले. त्यानंतर 'ईडी' त्यांचे घर विसरली, असा हल्लाबोल ठाकरे यांनी केला.

उद्धव ठाकरे

ठाकरे यांची हिंगोलीमध्ये सभा झाली. यावेळी त्यांनी भाजपवर जोरदार निशाणा साधला. ठाकरे म्हणाले, आम्ही 'इंडिया' म्हणून एकत्र आल्यानंतर लगेच आपले पंतप्रधान इतके घसरले आणि म्हणाले घमंडी आघाडी आहे. पूर्वी शाळेत एक प्राणी पाहिला होता अमिबा नावाचा. तसे 'एनडीए'चे झाले आहे. अमिबा सारखे कसेही वाढत आहेत. याचा पक्ष फोड त्यांचा पक्ष फोड असे करून 'एनडी'ए वाढवत आहेत. 'इंडिया'चे नाव घेऊन पुढे आलो आहोत. पंतप्रधान आफ्रिकेमध्ये गेले होते, तेव्हा चांद्रयान चंदावर गेले. तेव्हा, इंडियाचे पंतप्रधान म्हणून गेलात की 'इंडिया मुजाहिद्दीन'चे पंतप्रधान म्हणून गेला होतात, असा बोचरा सवाल ठाकरे यांनी नरेंद्र मोदी यांना केला. अतिरेक्यांना पाठबळ पाकिस्तान दोतो. मग भारत-पाकिस्तान सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी (छीशपवीर चेवळ) स्टेडियमवर कसा ? मग हे तुमचे देशप्रेम आहे का ? एका बाजूला आमच्यावर आरोप करायचे आणि तिकडे जाऊन मिठ्या मारायच्या हेच का तुमचे हिंदुत्व, असे सवाल ठाकरे यांनी केले.

साजन पाचपुते 'शिवबंधनात'

माणदेश एक्सप्रेस न्युज

अहमदनगर : नगर जिल्ह्यात सध्या उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडे राजकारणात जम बसवलेल्या मात्तब्बर नेत्यांचा ओढा वाढला असून शिवसेना आणि राष्ट्रवादीमधील फुटीनंतर बदललेल्या राजकीय परिस्थितीत उद्धव ठाकरे यांची शिवसेना नगर जिल्ह्यात उभारी घेण्याच्या तयारीत आहे.

साजन पाचपुते

भाऊसाहेब वाकचौरे आणि संजय छल्लारे यांच्या नंतर आता ठाकरेंच्या शिवसेनेत माजी मंत्री व भाजप आमदार बबनराव पाचपुते यांचे पुतणे आणि काष्टीचे सरपंच साजन पाचपुते येत्या ४ सप्टेंबर रोजी ठाकरेंच्या शिवसेनेत अधिकृत प्रवेश करत आहेत. यामुळे साजन पाचपुते यांनी आपल्या काकांची साथ सोडत वेगळा मार्ग निवडल्याची चर्चा होत आहे. याबाबत शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष प्रा.शशिकांत गाडे यांनी तसेच साजन पाचपुते यांनी या वृत्ताला दुजोरा दिला असून, येत्या ४ सप्टेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता शिवबंधन अर्थात पक्षप्रवेश सोहळा उद्धव ठाकरे यांच्या हस्ते मातोश्री'वर पार पडणार आहे.

शंभरापेंक्षा अधिक चारचाकी गाड्यांचा ताफा, तालुक्यात पक्ष प्रवेशाची चर्चा, बॅनर्स आदी माध्यमातून साजन पाचपुते यांचा ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश होतानाच, तालुक्यात याची दखल घेतली जाईल, याचे मोठे नियोजन केले जात असल्याचेही बोलले जात आहे.

अँटी रॅगिंग विषयी व्याख्यान संपन्न

कडेपूर : अँटी रॅगिंग याविषयी बोलताना ॲड. इंद्रजित देशमुख व उपस्थित मान्यवर

माणदेश एक्सप्रेस न्युज

कडेपूर : आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज कडेपूर व कडेगाव तालुका विधी सेवा समिती यांच्या वतीने अँटी रॅगिंग कमिटी अंतर्गत व्याख्यान संपन्न झाले. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून ड.जयवंतराव देशमुख व अँड. मनोजकुमार इनामदार उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूराव पवार हे होते. यावेळी कडेगांव येथिल दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर मा. जगदीश टी. कोरेगावकर प्रमुख उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी महाविद्यालयात 'विद्यार्थी' म्हणून उपस्थित असताना सर्वच विद्यार्थ्यांचे एकमेकांशी वर्तन कसे असावे व त्याचबरोबर अँटी रॅगिंग अंतर्गत येणारे कायदे, तक्रारी व शिक्षेचे स्वरूप याविषयी मार्गदर्शन केले. तसेच यावेळी ड. मनोजकुमार इनामदार यांनी पोक्सो कायदा व विद्यार्थ्यांचे वर्तन यासंदर्भात माहिती दिली. यावेळी अध्यक्षस्थानावरुन बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूराव पवार यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी स्वतःचे वर्तन इतर सर्वांना त्रासदायक ठरू नये याची काळजी घेणारे असावे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. दत्तात्रय होनमाने यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.शीला इंगवले यांनी तर शेवटी आभारप्रदर्शन प्रा.सौ.संगीता पाटील यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.